दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२२ एप्रिल २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 22 April 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 233 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## सामान्य महिलेने भाजपला आरसा दाखवला

**मुंबई**–वरळी येथे महायुतीच्या 'आक्रोश मोर्चा'मुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत एका सामान्य महिलेने भाजपचे नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना खरीखोटी सुनावली. या प्रकरणावरून आता विरोधकांकडून भाजपवर निशाणा साधण्यात येत आहे. भाजपच्या फोकनाड घोषणांपेक्षा सामान्य महिलेचा 'इथून चालते व्हा' हा एकच आवाज जास्त पॉवरफुल ठरला, अशा बोचऱ्या शब्दांत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. भाजपच्या इव्हेंटबाजीला मुंबईकर महिलेने वास्तवाचा आरसा दाखवला असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर न झाल्याने महायुतीच्या वतीने काँग्रेससह इतर विरोधी पक्षांविरोधात आज (२१ एप्रिल) वरळीत जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, या मोर्चामुळे दुपारच्या सुमारास वरळी आणि आसपासच्या परिसरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. दुपारी १ च्या सुमारास वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिक हैराण झाले होते.

# अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्सचा शुभारंभ

### सध्याच्या काळात या केंद्राचे महत्त्व

नागपूरसारख्या शहरांमध्ये दरवर्षी तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जाते. वाढत्या उष्णतेचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर, कामकाजावर, पाण्याच्या उपलब्धतेवर आणि वीज वापरावर होतो. त्यामुळे उष्णतेचा सामना करण्यासाठी योग्य नियोजन आणि उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. हे केंद्र उष्णतेचा नागरिकांवर आणि शहरांवर होणारा परिणाम समजून घेऊन, त्यावर सोपे आणि प्रभावी उपाय सुचवेल. विशेष म्हणजे, थंडावा मिळवताना पर्यावरणावर ताण येऊ नये, यावरही भर दिला जाईल. सुरुवातीला हे केंद्र आयआयएम नागपूरच्या परिसरात कार्यरत राहील. येथे संशोधन, प्रशिक्षण आणि धोरणात्मक मार्गदर्शन यावर भर दिला जाईल. राज्य आणि स्थानिक प्रशासनाला उष्णतेसंदर्भात योग्य नियोजन करता यावे, यासाठी मदत केली जाईल. तसेच, शहरांची रचना सुधारणा, ऊर्जा बचतीचे उपाय, आणि परवडणाऱ्या थंडावा तंत्रज्ञानाचा वापर यावर काम केले जाईल. विविध शहरांमधील चांगल्या पद्धतींचा अभ्यास करून त्या इतर ठिकाणी लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल. एनआरडीसी ही संस्था या केंद्राला तांत्रिक मार्गदर्शन देईल आणि महाराष्ट्र शासनासोबत समन्वय साधून आवश्यक संसाधने उपलब्ध करून देईल. आयआयएम नागपूर या केंद्राला आवश्यक जागा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार आहे. पुढील काळात हे केंद्र नागपूरमध्ये प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेत (एसआयडीएम) कायमस्वरूपी हलवण्यात येणार आहे.

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच 'उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स'चा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंग'चे उदघाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका



शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत आहे. २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांमधून, २०३५ पर्यंत ६५ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतांतून घेण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांना लागणारी १६ हजार मेगावॅट वीज सौर ऊर्जेद्वारे देण्याचा प्रयत्न सुरू आहे. वाढत्या उष्णतेमुळे सर्वत्रच एसी वापर वाढतो त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी यावर उपाय म्हणून राज्यात प्रभावी 'हीट ॲक्शन प्लॅन' राबवला जाईल. बांधकाम क्षेत्रात आणि दैनंदिन वापरात स्थानिक व पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्राधान्य देऊन विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थाकेंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या धर्तीवर मिहान, नागपूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी शासनाने रु. १८४ कोटी मंजूर केले आहेत. या इमारतीचे बांधकाम महाप्रित यांच्या माध्यमातून करण्यात येणार असून त्यामध्ये आठ सेंटर फॉर एक्सलन्स असणार आहेत. त्यातील एक केंद्र हे सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ण्ड सस्टेनेबल कुलिंग हे असणार आहे. यासाठी नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल न्यूयॉर्क या स्वयंसेवी संस्थेचे तांत्रिक सहकार्य लाभणार आहे.सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेझिलन्स ण्ड सस्टेनेबल कुलींग कामकाज राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (एसआयडीएम) मिहान, नागपूर येथून चालविण्यात येणार आहे.

### नागपूरला आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त: 'एनआरडीसी'चे अध्यक्ष मनीष बापना

नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना म्हणाले की, स्वच्छ ऊर्जा आणि त्यासोबतच शाश्वत कूलिंग या विषयांवर आपण जे लक्ष केंद्रित करत आहोत, ते आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आहेत. येणाऱ्या वर्षांत त्यांचे महत्व अधिकच वाढत जाणार आहे. विज्ञानक्षेत्रात प्रगती होत आहे आणि नवनवीन धोरणेही आखली जात आहेत. जोपर्यंत आपल्याकडे ही धोरणे राबवण्यासाठी सक्षम संस्था नसतील, तोपर्यंत आपण अपेक्षित प्रगती करू शकणार नाही. त्यामुळेच, एक्स्ट्रीम हीट अँड सस्टेनेबल कूलिंग'साठी नागपुरात विशेष 'सेंटर ऑफ एक्सलन्स' हे केंद्र केवळ भारतासाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी वैशिष्ट्यपूर्ण योगदान ठरेल. यामुळेच या केंद्राला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे असेही ते म्हणाले.

### उष्णतेच्या वाढत्या संकटावर तोडगा काढण्यासाठी आयआयएम नागपूरमध्ये विशेष केंद्र

नागपूरसह विदर्भात उन्हाळ्याची तीव्रता अधिक असते. या समस्येला तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) नागपूर आणि अमेरिकेतील 'नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल' (एनआरडीसी) या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार 'आयआयएम' नागपूरमध्ये उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स' या विषयावर उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह मध्य भारतातील उष्णतेचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन, या केंद्रामार्फत त्यावर उपाय शोधण्याचे काम केले जाणार आहे.

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मधुमित्र व 'मधुसखी' पुरस्कारा साठी ४ मे पर्यंत पुरस्कारांसाठी अर्ज करा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने सन २०२६ साठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकन मागविण्यात येत आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देणे व मधपालकांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, गेल्या तीन वर्षांपासून ही योजना राबविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि. ४ मे २०२६ पूर्वी संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी मधपालकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात येणार आहे. यातील एक पुरस्कार महिला मधमाळीसाठी राखीव आहे. पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे प्रथम रु. ११ हजार, द्वितीय रु. ७ हजार व तृतीय रु. ५ अशी आहे.दि. २० मे २०२६ रोजी जागतिक मधमाशी दिन निमित्त पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.नामांकन अर्ज मंडळाच्या www.mskvib.orgG$ या संकेतस्थळावर तसेच जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयात उपलब्ध आहेत.अधिक माहितीसाठी संपर्क जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा कार्यालय - संपर्क क्र. ८०८७६५६२१६, मधुक्षेत्रिक - ९४०४४९६६२१, संचालक, मध संचालनालय, महाबळेश्वर दू.क्र. ०२१६८-२६०२६४.

## धनेगाव येथील मांजरा धरणाचे दोन दरवाजे उघडले; नदीपात्रात ५२४१ क्युसेक्सने विसर्ग सुरू

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

लातूर पाटबंधारे विभाग क्रमांक १ च्या आदेशा नुसार,दि.२१ एप्रिल रोजी मांजरा धरणाचे (धनेगाव) दरवाजे उघडण्यात आले आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**दुपारी ३ वाजता उघडले अतिरिक्त दरवाजे**

धरण प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आज दुपारी ३-०० वाजता गेट क्रमांक २ आणि ५ हे दोन दरवाजे उचलण्यात आले आहेत. सद्यस्थितीत मांजरा धरणाच्या सांडव्याची



एकूण ६ वक्रद्वारे (क्र.१ ते ६) ०.२५ मीटरने उघडण्यात आली आहेत.

**नदीपात्रात मोठा विसर्ग**

या सहाही दरवाजांमधून मांजरा नदीपात्रात सध्या ५२४१.४२ क्युसेक्स (१४८.४४ क्युमेक्स) इतक्या वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. उन्हाळ्यात नदीला पाणी सोडण्यात आल्याने पात्रातील पाणी पातळी वाढणार आहे.

**नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

मांजरा प्रकल्प धनेगाव पूर नियंत्रण कक्षाने नदीकाठच्या आणि पुरामुळे बाधित होऊ शकणाऱ्या गावातील नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.नदीपात्रात उतरणे किंवा गुरेढोरे नेणे टाळावे,असे निर्देश कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग यांच्या वतीने देण्यात आले आहेत.तरी नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग यांनी कळविले आहे.

## चुलीतल्या लाकडाने सासऱ्याने जावयाला बदडले पुन्हा सासू, मेव्हणा अन् बायकोने सुद्धा तुडवले!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

पती-पत्नीच्या किरकोळ वादातून शेजारी राहणाऱ्या सासऱ्याने जावयाला चुलीतल्या पेटलेल्या लाकडाने मारहाण केली.त्यातच पुन्हा त्या जावयाला त्याच्या सासू,मेव्हणा आणि बायकोने सुद्धा काठीने मारहाण करून जखमी करून लाथा बुक्क्यांनी तुडविल्याची घटना समोर आली आहे.

केज येथील बीड रोड जवळ असलेल्या आश्रम शाळेच्या जवळ एकनाथ उत्तम सावंत हे मूळचे अहिल्यानगरजिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सुरेशनगर येथील डवरी गोसावी जातीचे भटके कुटुंब राहत आहे. एकनाथ सावंत यांच्या झोपडी शेजारीच झोपडी करून त्याचे सासरे भीमराव तात्याराव शिंदे यांचे कुटुंब राहत आहे.एकनाथ सावंत हा त्याचे सासरे भीमराव शिंदे यांचा पीक-अप चालवित असल्याने त्याने दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी ७-३० वाजण्याच्या सुमारास




त्यांच्या पत्नीला तिच्या वडिलांकडे कामाचे पैसे मागून घे. असे म्हणाला.असे म्हणण्याने त्यांच्यात किरकोळ भांडण झाले होते.त्यांचे भांडण कानावर पडताच भीमराव शिंदे याने जावई एकनाथ सावंत याला काठीने मारहाण करून जखमी केले.तसेच चुलीतल्या जळत्या कोळीताने मारून जखमी केले.तसेच सासू मीराबाई शिंदे,मेव्हणा विजय शिंदे आणि बायको मनिषा यांनी त्याला लाथाबुक्क्यांनी चांगलाच तुडवला.त्या नंतर एकनाथ त्यांच्या तावडीतून निसटून गावाकडे पळून गेला आणि त्याला झालेल्या मारहाणीची माहिती त्याच्या आईला दिली.दि.१९ एप्रिल केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून सासरा भीमराव शिंदे,सासू मीराबाई शिंदे,मेव्हणा विजय शिंदे आणि पत्नी मनिषा सावंत यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी महिला पोलिस हेडकॉन्स्टेबल निर्मला जाधव या तपास करीत आहेत.

## सिद्धिविनायक मंदिर वकीलवाडी केज येथे अक्षयतृतीयाच्या शुभ मुहूर्तावर पाणपोईचा शुभारंभ



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील सिद्धी विनायक मंदिर वकीलवाडी येथे अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर पाणपोईचा शुभारंभ जेष्ठ नागरिक श्रीहरी शेठ टांकसाळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. वैशाख महिन्यात सुर्य आग ओकत असुन नागरिकांच्या अंगांची लाहीलाही होत आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे.याचा विचार करून सिद्धीविनायक मंदिराचे पुजारी श्री.अनंत देवा कोकिळ,भुतडा सेठ, मंदार भैय्या देशपांडे, रोहन वेदपाठक,श्रीधर नाना खोत यांनी चर्चा करून अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर पाणपोई सुरू करण्याचा निर्णय घेतला.या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असुन येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.यामुळे नागरिकांना कर्कश्य उन्हाळ्यातही पिण्याच्या
थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी पाणपोई चालू केल्याबद्दल सिद्धी विनायक मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत.

# संपादकीय

## युद्धज्वराचा हिंदोळा

आखाती युद्ध केवळ भूराजकीय संघर्ष नसून जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे संकट ठरते. तेलाच्या किमतींपासून रोजगारापर्यंत प्रत्येक स्तरावर त्याचे परिणाम दिसून येतात. अशा वेळी दीर्घकालीन उपाययोजना, पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा विकास, आर्थिक स्वावलंबन आणि स्थिर धोरणे यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. अन्यथा, प्रत्येक जागतिक संघर्षासोबत अर्थव्यवस्थेची हीच घसरण पुन्हा पुन्हा अनुभवावी लागेल.आखाती प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण आता येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा.युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही गुंतवणूकदारांसाठी सर्वात मोठा अडथळा असते. देशांतर्गत तसेच परदेशी गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भांडवली बाजारातील विश्वास कमी होतो आणि नवीन गुंतवणुकीचा ओघ मंदावतो. परकीय गुंतवणूक घटल्यास तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढ यांवरही नकारात्मक परिणाम होतो. या सर्व प्रक्रियेचा फटका बसतो तो रोजगार क्षेत्राला. उद्योगांमध्ये उत्पादन कमी झाले, गुंतवणूक थांबली आणि नफा घटला की कंपन्या सर्वप्रथम मनुष्यबळावर गदा आणतात. नवीन भरती थांबते, कंत्राटी कर्मचाऱ्यांची कपात होते आणि काही वेळा कायमस्वरूपी नोकरकपातही केली जाते. सेवाक्षेत्रातही याचा परिणाम जाणवतो, कारण ग्राहकांचा खर्च कमी झाल्याने व्यवसायांवर ताण वाढतो. परिणामी मध्यमवर्गीय तसेच निम्नवर्गीय कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटते. युद्धाचा परिणाम केवळ थेट आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या मानसिकतेवरही परिणाम करतो. अनिश्चिततेमुळे लोक खर्च करण्यापेक्षा बचतीकडे वळतात. त्यामुळे बाजारातील मागणी आणखी घटते. हीच साखळी अर्थव्यवस्थेच्या मंदीला अधिक गती देते. जागतिक स्तरावर व्यापारमार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्यास निर्यात-आयात व्यवहारांवरही परिणाम होतो आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेलाच धक्का बसतो. अशा परिस्थितीत सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक वाढ टिकवून ठेवणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करणे कठीण होते.यातून वित्तीय तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो, तर सामाजिक कल्याण योजनांवरील खर्च वाढवण्याची गरजही भासते. त्यामुळे आर्थिक धोरणे आखताना संतुलन साधणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पश्चिम आशियातील इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यातील भीषण संकटाच्या छाया आता भारतीय अर्थव्यवस्थेवर पडू लागल्या आहेत. या युद्धाचा फारसा परिणाम होणार नाही आणि आम्ही विशेष काळजी घेतली आहे, असे केंद्र सरकारतर्फे सांगण्यात येत असले, तरी इतर देशांप्रमाणे भारतावरही विपरीत परिणाम होणार आहे, हे स्पष्ट आहे. 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने २०२६-२७ साठी भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा अंदाज ६.८ टक्क्यांवरून ६ टक्के इतका खाली आणला आहे. याचे कारण या युद्धामुळे होर्मुझ खाडीमधील वाहतूक अनेक देशांसाठी बंद झाली आणि अन्यत्रही क्षेपणास्त्र हल्ले सुरू असल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी ५५ आणि एलपीजीपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा याच युद्धग्रस्त भागातून होतो. खतांच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२४-२५ मध्ये २.४ टक्के असलेली सरासरी महागाई आता ४.८ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. यापूर्वी, म्हणजे १९७३ मध्ये तेल निर्यातदार राष्ट्रांनी अचानकपणे इंधनाचे दर वाढवल्यामुळे भारतावर महासंकट कोसळले होते. त्यावेळी याच्या परिणामी, तसेच सातत्याच्या दुष्काळामुळे भाववाढीचे संकट कोसळले होते.आजघडीला भारताची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली आहे. अन्नधान्याची टंचाई केव्हाच दूर झाली आहे. परंतु तरीही आताचा काळ जागतिकीकरणाचा असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता युद्धजन्य स्थितीचे फटकेही जास्त बसण्याची शक्यता असते. याचे कारण परदेशांतून भारतात येणाऱ्या पैशांपैकी ४० टक्के वाटा हा आखाती देशातून येतो. त्याचप्रमाणे उदारीकरणानंतर जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा हळूहळू वाढत आहे आणि वेगवेगळ्या वस्तूंची व सेवांची निर्यात भारत करू लागला आहे. युद्धाच्या वणव्यामुळे अमेरिकेतील इंधनदराने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. युद्धापूर्वी तीन डॉलर प्रति गॅलनच्या खाली असलेले पेट्रोल दर चार डॉलरच्या पार गेले. तर मालवाहतुकीसाठी कणा मानल्या जाणाऱ्या डिझेलच्या किमतीत युद्ध सुरू झाल्यापासून ४७ टक्क्यांची वाढ झाली आणि त्याचे दर ५.५०डॉलर प्रति गॅलनपर्यंत पोहोचले. युरिया आणि खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर सुमारे ५० हजार डॉलर्सचा अतिरिक्त बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे कम्प्युटर चिप्स बनवण्यासाठी लागणाऱ्या हेलियम वायूचा ३५ टक्के पुरवठा कतारमधून होतो. हा पुरवठा थांबल्याने सिलिकॉन व्हॅलीतील टेक कंपन्यांवर मोठे संकट कोसळले आहे. रुग्णालयातील एमआरआय उपकरणासाठी हेलियम अनिवार्य असतो, ज्याची टंचाई आता दूर व्हायला हवी. होर्मुझची नाकेबंदी अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेमध्ये मंदी येणे अटळ आहे. अमेरिकेचा २०२६ मधील विकासदर २.६ टक्क्यांवरून थेट एक टक्क्यावर येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. याचा अर्थ अमेरिका पुन्हा एकदा १९७०च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन'सारख्या परिस्थितीत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत विकासदर कमी आणि महागाई जास्त असते. शिवाय युद्ध थांबले तरी बंद झालेल्या तेलविहिरी पुन्हा सुरू होण्यासाठी अनेक महिने लागतात.

# केज-धारूर रोडवरील जीवघेणा धोकेदायक पूल तात्काळ दुरुस्त करा : २९ एप्रिल रोजी रस्ता रोको

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज-धारूर रोडवर साने गुरुजी निवासी Smartphone जवळचा पूल पूर्णपणे खचला असून हा पूल अत्यंत धोकेदायक स्थितीत आहे. या पुलाचे काम पूल उकलून पुन्हा नव्याने करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने येत्या बुधवार दि २९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता केज-धारूर रोडवर पुलाच्या ठिकाणीच तांबवा व परिसरातील नागरिकांच्या सहभागाने बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.



खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज ते माजलगाव दरम्यानचे रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाल्याने हा रस्ता वाहतूकीसाठी अत्यंत धोकेदायक बनला आहे. केज नजीक सानेगुरुजी विद्यालयाजवळचा पूल गेली अनेक वर्षांपासून खड्डे पडल्याने धोकेदायक बनला आहे. वेळोवेळी मागणी केल्यानंतर पुलाचे काम तात्पुरते केले गेल्याने सतत या भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तांबवा व परिसरातील नागरिकांना हा पूल म्हणजे मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावरून प्रथमच प्रवास करणाऱ्या दूर गावच्या वाहनचालकांच्या पुलावर पडलेले खड्डे लक्षात येत नसल्याने सतत अपघात घडत आहेत. २१ एप्रिल रोजी सकाळी ११ च्या सुमारास याच ठिकाणी दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीवरील महिला व पुरुष गंभीर जखमी झालेले आहेत. आजपर्यंत या खचलेल्या पुलावर अनेक अपघात झाले आहेत ज्यामध्ये कांही लोकांचे प्राणही गेले आहेत.

त्यामुळे हा पूल आता त्यातील सर्व दोष दूर करून नव्यानेच त्याचे बांधकाम करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने या परिसरातील नागरिकांच्या सहभागाने २९ एप्रिल रोजी सकाळी ठीक १० वाजता पुलाच्या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या विषयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व इतर संबंधित यंत्रणाना पाठवण्यात आले आहे.

निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, नासेर मुंडे, इंजिनिअर मोहनराव कराड, शेषराव घोरपडे, महेश बडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कामगार भूषण पुरस्काराची संख्या वाढवावी आमदार सुनील प्रभू यांची मुख्यमंत्री व कामगार मंत्र्यांकडे पत्राद्वारे केली मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या ६० लाखाहून अधिक कामगारापैंकी पात्र कामगारांना योग्य न्याय व सन्मान मिळण्याकरिता राज्यातील प्रत्येक विभागानुसार कामगार भूषण पुरस्काराची संख्या ०७ पर्यंत वाढवण्यात यावी अशी मागणी दिंडोशीचे शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्र हा देशाच्या औद्योगिक प्रगतीचा कणा असून, राज्यातील लाखो कामगारांच्या कष्ट, प्रामाणिकपणा व समर्पणामुळेच ही प्रगती साध्य झाली आहे. राज्यामध्ये कल्याण निधी भरणारे सुमारे ६० लाखांहून अधिक कामगार विविध क्षेत्रांत कार्यरत असून, त्यांच्या योगदानाची दखल घेणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. असे दिंडोशी चे शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे .महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून सद्यस्थितीत कामगार भूषण हा मानाचा पुरस्कार संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ एकाच कामगाराला देण्यात येतो, असे सांगत आमदार सुनील प्रभू यांनी आपल्या पत्रात पुढे लिहिले आहे की ही बाब अत्यंत मर्यादित व वास्तवाशी विसंगत आहे. यामुळे अनेक पात्र कामगारांना न्याय व सन्मानापासून वंचित रहावे लागत आहे. महाराष्ट्रासारख्या विशाल राज्यात, जिथे कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर असे विविध विभाग आहेत, तेथे एकच पुरस्कार देणे म्हणजे असंख्य पात्र, कर्तृत्ववान कामगारांवर अन्याय करण्यासारखे असल्याचे शिवसेना आमदार सुनील प्रभू यांनी आपली स्पष्ट करीत पुढे म्हणाले की अशा



परिस्थितीत कामगार भूषण या पुरस्कारासाठी पात्र कामगारांचा सन्मान होण्याऐवजी ते दुर्लक्षित राहतात, कामगारांमध्ये निर्माण होणारी प्रेरणा व उत्साह कमी होतो, तसेच निवड प्रक्रियेत अनावश्यक ताण व मर्यादा निर्माण होतात. त्यामुळे, राज्यातील प्रत्येक विभागानुसार किमान ०७ कामगार भूषण पुरस्कार देण्याचा निर्णय तातडीने घेण्यात यावा, ही माझी ठाम व रास्त मागणी आहे.यामुळे अधिकाधिक पात्र कामगारांना योग्य न्याय व सन्मान मिळेल,असे शिवसेना आमदार सुनील प्रभू यांनी पत्रात म्हटले असून ते पुढे म्हणजे म्हणाले कामगार वर्गामध्ये सकारात्मक ऊर्जा व प्रेरणा निर्माण होईल आणि शासनाबद्दलचा विश्वास अधिक दृढ होईल. असे सांगत शिवसेना आमदार यांनी आपल्या पत्रात शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना विनंती करीत पत्रात कृपया राज्यातील कष्टकरी कामगारांना सन्मान देण्यासाठी कामगार भूषण पुरस्काराची संख्या १ वरुन ०७ करण्यास मान्यता देऊन, कामगार कल्याण मंडळास तसे शासन निर्णय निर्गमीत करून, आदेश देण्यात यावेत, असे म्हटले आहे.

# ठाणे महानगरपालिकेचे नेत्रतपासणी केंद्र व पशुवैद्यकीय विभागाचे नुतनीकरण



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने वर्तकनगर येथील स्व. निर्मलादेवी चिंतामण दिघे रुग्णालय, लोकमान्य टिळक नर्सिंग होम येथे नेत्र तपासणी व उपचार केंद्र व वागळे इस्टेट येथील जीर्ण झालेल्या पशु शस्त्रक्रिया विभागाचे नूतनीकरण करून नवीन ८८ पिंजऱ्यांसह उदघाटन नुकतेच महापौर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाणे, स्थानिक नगरसेविका एकता भोईर, संध्या मोरे, यज्ञा भोईर, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील आदी उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा उपक्रम समाजासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.डोळे हे मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचे अवयव असून योग्य वेळी तपासणी व उपचार न झाल्यास दृष्टीदोष निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत हे नवीन केंद्र नागरिकांसाठी आशेचा किरण ठरणार असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाइन यांनी दिलेले सहकार्य मोलाचे आहे. या केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना आधुनिक नेत्र तपासणी, योग्य उपचार आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तर वागळे इस्टेट येथे जीर्ण झालेल्या पशुवैद्यकिय विभागाअंतर्गत भटक्या कुत्र्यांसाठी ६० ते ७० पिंजरे होते, सदर केंद्राचे नुतनीकरण करुन नवीन ८८ पिंजऱ्याचे उद्धाटन करण्यात आले.

# वनिता गायकवाड यांच्या स्मृतिदिनी आरोग्य शिबिराचे आयोजन; विक्रोळीत सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

कालकथित वनिता विठोबा गायकवाड यांच्या स्मृतिदिनी विक्रोळीतील कन्नमवार नगर परिसरात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शाहीर विठ्ठल नांदुरकर प्रतिष्ठान आणि प्रभात मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.विरंगुळा केंद्रात पार पडलेल्या या शिबिरात झिनोव्हा शालबी (Zynova Shalby) हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक ते उपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.या कार्यक्रमाला शाहीर विठ्ठल नांदुरकर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा करुणा सिद्धार्थ भोसले, सचिव ॲड.अश्विनी अरुण कसबे, खजिनदार लुंबिनी कदम, उपाध्यक्ष जितेश कदम, उपसचिव प्रशिक भोसले, संबोधि जाधव, सिद्धार्थ भोसले तसेच प्रभात मित्र मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव नासिकेत पानसरे आणि खजिनदार गौतम डांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रभात मित्र मंडळाच्या सभासदांनी उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. शाहीर विठ्ठल नांदुरकर प्रतिष्ठानच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ठाणे महानगरपालिकेतील नगरसेवकांना ओळखचिन्हाचे वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना आज झालेल्या मा. सर्वसाधारण सभेत महापालिकेचे बोधचिन्ह असलेल्या 'नगरसेवक ओळख' चिन्हाचे वाटप महापौर शर्मिला पिंपळोलकर महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे नगरसेवकांची गेल्या अनेक वर्षापासून असलेली मागणी पूर्ण झाली आहे.महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद सदस्य असलेले बोधचिन्ह वाटप करण्यात येते त्याप्रमाणे ठाणे महापालिका सदस्यांना ओळखपत्रासोबत नगरसेवक असे दर्शविणारे ओळख चिन्ह द्यावे अशी मागणी शिवसना गटनेते पवन कदम यांनी पत्रान्वये महापौरांकडे केली होती.

महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी याबाबत ठाणे महापालिकेतील सर्व सदस्यांना महापालिकेचे बोधचिन्ह असलेले ओळख चिन्ह देण्याबाबत आयुक्त सौरभ राव यांना पत्र दिले होते. त्यानुसार आयुक्त सौरभ राव यांनी तातडीने दखल घेत महापालिकेतील नगरसेवकांना बोधचिन्ह देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले होते. त्यानुसार




आज सोमवार दिनांक २०/०४/२०२६ रोजी झालेल्या मा. सर्वसाधारण सभेत या ओळख चिन्हाचे वाटप सर्व नगरसेवकांना महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, सर्वपक्षीय गटनेते उपस्थित होते.

गेले साडेतीन वर्षे महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवट होती. जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या निवडणुकीत ठाणे महानगरपालिकेत नवीन नगरसेवकांची संख्या जास्त आहे. नगरसेवक हे कामानिमित्त सतत महानगरपालिकेच्या मुख्यालयात तसेच प्रभाग समिती कार्यालयात जात असतात. शासकीय- निमशासकीय कार्यालयांमध्ये कामकाजाच्या निमित्ताने ये-जा करताना सदस्यांची ओळख सुलभ व्हावी तसेच प्रशासकीय समन्वय अधिक प्रभावी होण्यासाठी महापालिकेचे बोधचिन्ह असलेले नगरसेवक ओळखचिन्ह उपयुक्त ठरणार असल्याचे शिवसेना गटनेते पवन कदम यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांना देण्यात आलेल्या पत्रात नमूद केले होते. दरम्यान नगरसेवक भरत चव्हाण यांनी देखील प्रस्तावाची सूचना महापौरांना दिली होती. आज मा. सर्वसाधारण सभेत सर्व नगरसेवकांना ओळख चिन्हाचे वाटप केल्याबद्दल सर्व पक्षीय नगरसेवकांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांचे आभार मानले.

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ ने डॉ.श्री शामसुंदर पंडितराव कणके सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता पुणे स्वारगेट येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे, भारत विभूषण पंजाब सरकार श्री दिगंबर तायडे, सहाय्यक पोलीस आयुक्त पुणे सौ. रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री राम मांडुरके व अध्यक्ष अशोक गोरड उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.सामाजिक विभाग, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे हेगडेवार शाळेजवळील सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. शामसुंदर पंडितराव कणके. श्री शामसुंदर कणके यांनी गोरगरीब समाजातील वंचित घटकातील, मुला, मुलींसाठी शाळा काढून त्यांना मोफत आणि दर्जेदार शिक्षण दिले. तसेच मराठवाडा, विदर्भ, खानदेश हा प्रदेश सतत दुष्काळाच्या छायेत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करतात. या आत्महत्या थांबवण्यासाठी कणके यांनी सिंधुताई सपकाळ, ज्ञानेश वाकुडकर यांच्यासोबत व्याख्याने देऊन शेतकऱ्यांना आत्महत्या न करण्याचे कळकळीचे



आवाहन केले. तसेच तेथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेटी देऊन त्यांना कायमचे स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांच्या ५०० मुले, मुलींना छत्रपती संभाजीनगर येथे आणून त्यांना उच्च शिक्षणापर्यंतचे मोफत व दर्जेदार शिक्षण दिले. या प्रकल्पातून बरीचशी मुले आणि मुली आज उच्च शिक्षण घेत असून नोकरी व्यवसायात स्थिर स्थावर झाली आहेत. या सर्व कामी बिटवाईज कंपनी पुणे, मॅन अँड डिझेल कंपनी छत्रपती संभाजीनगर तसेच मुला मुलींच्या फीस साठी डव्होकेट अतुल शहा मुंबई, विजय झरकर दुबई, उदय देशमुख जर्मनी, वासुदेव पटेल गुजरात, श्वेता भारतीया, डॉ. मंगेश कदम दोघेही छत्रपती संभाजीनगर अशा प्रतिष्ठित दानशूर व्यक्तींची मदत होत असते. तसेच याचबरोबर पर्यावरण संतुलनासाठी हजारोंच्या वर वृक्षारोपण त्यांनी केले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल म्हणून त्यांना सामाजिक क्षेत्रातील आदर्श समाजसेवक म्हणून भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन त्यांना गौरवण्यात आले. या व्यतिरिक्त आतापर्यंत त्यांना सेवातीर्थ फाउंडेशनचा भारत गौरव पुरस्कार, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन पुणे यांचा महाराष्ट्र गौरव सन्मान पुरस्कार, जीवन जागृती सेवा संस्थेचा भारत एक्सलन्स अवॉर्ड तसेच बालगंधर्व परिवार पुणे यांचा बालगंधर्व पुरस्कार, पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ, वृंदावन मथुरा, उत्तर प्रदेश यांचा विद्यावाचस्पती सारस्वत सन्मान अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आजही त्यांचा हा प्रकल्प गोरगरीब वंचित अनाथ होतकरू शेतकरी कुटुंबातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे चालू आहे. कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता बागरेचा यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.

# खरीप हंगामात नियमानुसार विमा भरूनही नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकरी संतप्त

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणारी प्रधानमंत्री पिक विमा योजना देगलूर तालुक्यात अपयशी ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. खरीप हंगामात नियमानुसार विमा भरून ही नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकरी संताप झाले असून आक्रोश व्यक्त करत आहेत.



देगलूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर आणि कापूस या पिकांसाठी मोठ्या अपेक्षेने विमा घेतला होता. मात्र अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि रोगराईमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. तरीही शेतकऱ्यांच्या खात्यात एकही रुपया जमा झालेला नाही. त्यामुळे 'शेतात सर्व काही उद्ध्वस्त झाले. पण खात्यात शुन्यच!' अशी तीव्र प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

योजनेत कागदोपत्री अडथळे, तक्रार प्रक्रियेतील विलंब आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. प्रत्यक्ष शेतात नुकसान स्पष्ट दिसत असतानाही मदतीऐवजी केवळ कारणे दिली जात असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

चौकटीत घ्या

दरम्यान, संबंधित यंत्रणे कडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. शेतकऱ्यांना आधार देणारी योजना आता त्यांच्या नाराजीचे कारण ठरत असून प्रशासनावरील विश्वास कमी होत चालला आहे. संतप्त शेतकऱ्यांनी तात्काळ नुकसान भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याच्या इशाराही त्यांनी दिला आहे.

# खरवंडी परिसरात आधुनिक सुविधांनी सज्ज 'साईदिप हॉस्पिटल'चा दिमाखात शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

खरवंडी परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य सुविधांची मोठी उणीव भरून काढणाऱ्या साईदिप हॉस्पिटल व स्वामी समर्थ मेडिकल या अत्याधुनिक आरोग्य सेवेच्या केंद्राचा शुभारंभ अक्षयतृतीयेच्या शुभ मुहूर्तावर रविवारी (दि. १९ एप्रिल २०२६) मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. यावेळी धार्मिक विधी व पूजन करून मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार मोनिकाताई राजळे या होत्या. शुभहस्ते उद्घाटन ह.भ.प. गुरुदेव महंत आदिनाथ महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र तारकेश्वरगड) यांच्या हस्ते पार पडले.या प्रसंगी प्रमुख उपस्थितीत मा. प्रताप काका ढाकणे, मा. डॉ. ए. बी. जायभाये, मा. डॉ.



गौतम काळे, मा. डॉ. दीपक जायभाये, मा. डॉ. रवी ठाणगे मा. डॉ. आरती जायभाये, मा. अभय काका आव्हाड मा. डॉ. भगवान दराडे यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, साईदिप हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर व परवडणारी वैद्यकीय सेवा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाचे नियोजन श्री. अक्षय बुवासाहेब खेडकर, डॉ. निलेश बुवासाहेब खेडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नवीन हॉस्पिटलमुळे खरवंडी व परिसरातील रुग्णांना आता अत्याधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून, यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# परळीत श्री.भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त शानदार शोभायात्रा; आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाला शुभारंभ

## शिस्तबद्ध व मंगल वातावरणाच्या आदर्शाने शोभायात्रा लक्षवेधी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त परळी शहरात शानदार शोभायात्रा काढण्यात आली. आ. धनंजय मुंडे व नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शोभा यात्रेचा शुभारंभ झाला. शांतता व शिस्तीच्या आदर्शाने शोभायात्रा लक्षवेधी ठरली. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मप्रेमी सहभागी झाले होते. सकल ब्राह्मण समाज यांच्या वतीने या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.





संत जगमित्रनागा मंदिर येथुन शोभायात्रेला प्रारंभ झाला. प्रारंभी आ. धनंजय मुंडे ,नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, आदी मान्यवरांच्या हस्ते भगवान परशुराम प्रतिमेचे पूजन करून व माल्यार्पण करून शोभायात्रेस सुरूवात झाली. नेहरू चौक - राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक- गणेशपार -नांदूरवेस - सरकारवाडा - अंबेवेस- काळाराम मंदिर पर्यंत नगरप्रदक्षिणा करण्यात आली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी व उपस्थित सर्व महिलांच्या शुभहस्ते भगवान परशुरामांची आरती करून जन्मोत्सव सोहळ्याचा समरोप झाला. या दिव्य सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. ब्राह्मण समाज बांधव सहकुटुंब या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्यात महिलांचा लक्षणिय सहभाग होता.

सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. परळी शहरातून मुख्य मार्गावर शांतता व शिस्तीच्या आदर्शाने निघालेली शोभायात्रा लक्षवेधी ठरली. 'भारत माता की जय','वंदे मातरम्','जय श्रीराम -जय परशुराम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत करून नागरीकांनी भगवान परशुरामाचे दर्शन घेतले. जुन्या गावभागात जागोजागी रांगोळी व महिलांनी भगवान परशुरामांचे औक्षण करून दर्शन घेतले. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मप्रेमी नागरीक, सर्व ज्ञातीय बांधव, समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सकल ब्राह्मण समाज आयोजित भगवान परशुराम जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# अमरसिंह पंडित यांना विधानपरिषदेवर संधी द्या–राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा शितल धोंडरे यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी जिल्ह्याच्या विकासात आणि पक्ष संघटनेत दिलेले योगदान पाहता, त्यांना आगामी विधानपरिषद निवडणुकीत काम करण्याची संधी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्याध्यक्षा शितल धोंडरे यांनी केली आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शितल घोंडरे यांनी म्हटले आहे की, अमरसिंह पंडित यांचा दांडगा जनसंपर्क आणि प्रशासकीय कामाचा अनुभव पक्षासाठी नेहमीच फायदेशीर ठरला आहे.
सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन
चालणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. मराठवाडा आणि विशेषतः बीड जिल्ह्याचे प्रश्न विधिमंडळात प्रभावीपणे मांडण्यासाठी त्यांच्यासारख्या अनुभवी नेतृत्वाची गरज आहे. अमरसिंह पंडित यांनी यापूर्वी देखील आपल्या कार्यकाळात विकासाची अनेक कामे मार्गी लावली आहेत. सध्याची राजकीय परिस्थिती आणि पक्षाची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी त्यांना विधानपरिषदेवर पाठवणे आवश्यक असल्याचे मत धोंडरे यांनी व्यक्त केले. या मागणीमुळे राजकीय



वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, पक्षश्रेष्ठी यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वाई बाजार येथे भीम जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचा महापूर; रक्तदान शिबिर व वकृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून वाई बाजार येथे विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' हा संदेश केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष कृतीतून साकारल्याने वाई बाजारच्या या जयंती उत्सवाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या जयंती सोहळ्याची सुरुवात १४ एप्रिल रोजी सकाळी ठीक ९ वाजता निळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली. उपासक दिलीप खडसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून धम्मध्वजाला मानवंदना देण्यात आली, तर बुद्ध विहार जवळील पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण उपासिका अंजनाबाई गायकवाड यांच्या हस्ते पार पडले. सामूहिक पंचशील ग्रहण केल्यानंतर रक्तदान शिबिराला सुरुवात झाली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णालयांमध्ये रक्ताचा होणारा तुटवडा लक्षात घेऊन वाई बाजारच्या तरुणांनी हा पुढाकार घेतला होता. या शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान करून महामानवाला अभिवादन केले. यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय



रक्तपेढीच्या चमूने रक्त संकलनाचे काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले. यात समाधान जाधव, निरंजन केशवे, पिंटू पाटील, डॉ. रमेश गावंडे, अंबादास राजूरकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर सर, साजिद खान, खान उस्मान खान चांदखान पठाण, डॉ. झनक मानकर, नवीद खान, यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. जयंती उत्सवाचा भाग दोन म्हणून १७ एप्रिल रोजी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या वक्तृत्वाचा ठसा उमटवला. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ड. छंदक वाठोरे यांनी केले. यात लहान गटात आर्णव सारंग साळुंके (प्रथम), शौर्या मुनेश्वर थोरात (द्वितीय), माही आकाश सातव (तृतीय), निहारिका रणजीत शेंडे (चतुर्थ), मोठा गटात दिव्यांनी मनोज पवार (प्रथम), पूर्वी पिंटू चव्हाण (द्वितीय), किर्ती अरविंद राठोड (तृतीय), वेदिका रवी राठोड (चतुर्थ) अश्या प्रकारचे विद्यार्थ्यांनी नंबर मिळवला यात पर्यवेक्षक म्हणून प्रा. विनोद गेडाम, ड. छंदक वाठोरे, अर्चना घोलार मॅडम हे होते. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता समता सैनिक दलाच्या उपस्थितीत भव्य पथसंचन रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठीविहार समितीचे अध्यक्ष प्रल्हाद खडसे, उपाध्यक्ष बाबाराव कंधारे , कार्यवाह दिलीप पठाडे, भीम जयंती समितीचे अध्यक्ष विजय खडसे, उपाध्यक्ष सागर खडसे, अनाथपिंडक कंधारे, विशाल टोके, विशाल खडसे, संदेश खडसे, मिलिंद गायकवाड, अविनाश पठाडे, यश खडसे, प्रफुल खडसे, अक्षय पठाडे, अजय खडसे, सिद्धार्थ खडसे, सुमेध खडसे, श्रीकांत मुजमुले, सम्यक खडसे, सौरभ खडसे, रोहन पारधे, दिप कंधारे, विशाल पारधे, बालाजी खडसे आदी भीम जयंती समितीचे सर्व सदस्य , रमाई महिला मंडळ आणि बौद्ध उपासक आणि उपासिका यांनी विशेष परिश्रम घेतले.

# १९६२ हेल्पलाईनचा यशस्वी टप्पा; वर्षभरात ४,०१,९९२ कॉल्स, ३.७८ लाख तक्रारींचे निवारण

## दुर्गम भागातील ३४९७९ पशुपालकांना लाभ; 'गोल्डन अवर' मधून ६४७५९ पशुधनाला जीवदान

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जनावरांचे आरोग्य धोक्यात आले की, शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडते. मात्र, आता अद्ययावत तंत्रज्ञान आणि १९६२ मोबाईल वेटरनरी क्लिनीक यांच्या समन्वयामुळे पशुपालकांना मोठा आधार मिळाला आहे. या सुविधेमुळे केवळ उपचारांमधील वेळच वाचला नाही, तर दुर्गम भागातील हजारो पशुधनास वेळेत 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. '१९६२ कॉल सेंटर' आणि मोबाईल वेटरनरी क्लिनीक यांच्यातील तांत्रिक समन्वयामुळे पशुपालकांना आपल्या दारापर्यंत पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या आहेत, जे ग्रामीण समृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

वर्षभरात या कॉल सेंटरकडे एकूण ४,०१,९९२ कॉल्स प्राप्त झाले. अत्यंत कौतुकास्पद बाब म्हणजे, यापैकी ३,७८,०३५ पशुधनाच्या आजारविषयक समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील पशुपालकांसाठी ही सेवा 'लाईफलाईन' ठरली असून, तब्बल ३४,९७९ पशुपालकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. हे केवळ आकडे नसून, पशुसंवर्धन क्षेत्रातील समर्पित पशुवैद्यकीय सेवेचे निदर्शक आहे.

अपघात, विषबाधा किंवा कठीण प्रसूती अशा आपत्कालीन स्थितीत 'गोल्डन अवर' (पहिली महत्त्वाची घटका) मध्ये उपचार मिळणे अनिवार्य असते. कॉल आल्यानंतर अवघ्या १.५ तासात पशुवैद्यकीय पथक प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचते. या तत्परतेमुळे एकूण ६४,७५९ पशुधनाचे प्राण वाचले आहेत. यामध्ये २९,१३० मोठे पशुधन व ३५,५६९ लहान पशुधनाचा समावेश आहे. पशुवैद्यकीय शास्त्रात 'गोल्डन अवर' मधील उपचारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण या काळात मिळालेले उपचार पशुधनाच्या मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करतात.

पूर्वी किरकोळ आजारासाठीही पशुधनाला दवाखान्यात नेणे जिकिरीचे व महागडे ठरत असे, परंतु आता तज्ज्ञ पशुवैद्यक स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत आहेत. यामुळे केवळ आजार बरे होत नाहीत, तर वेळेवर मिळालेल्या मार्गदर्शनामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेही सुलभ झाले आहे. परिणामी, दुग्धव्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन न राहता एक शाश्वत व फायदेशीर व्यवसाय म्हणून आकारास येत आहे. शेतकऱ्यांमधून या सेवेबाबत समाधानाची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

**१९६२ हेल्पलाईनद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा**

औषधोपचार: आजारी जनावरांवर तातडीने उपचार.
शस्त्रक्रिया: छोट्या व मोठ्या शस्त्रक्रियांची सुविधा.
खच्चीकरण: शास्त्रीय पद्धतीने खच्चीकरण सेवा.
कृत्रिम रेतन: पशुपैदास सुधारणेसाठी कृत्रिम रेतन.
जंतनाशक उपाययोजना: जनावरांच्या पोटातील जंतांवर नियंत्रण.
लसीकरण: विविध साथरोगांपासून बचावासाठी लसीकरण.
मार्गदर्शन: पशुआरोग्य व योग्य आहार व्यवस्थापन सल्ला
वंध्यत्व तपासणी: जनावरांमधील वंध्यत्व तपासणी व निर्मुलन.
अपघात सेवा: नैसर्गिक आपत्तीत सहाय्य, भाजणे, सर्पदंश, व इतर सर्व आपत्कालीन समस्यांबाबत तात्काळ प्रतिसाद व उपचार.योजनांची माहिती: पशुसंवर्धन विभागाच्या विविध शासकीय योजना.
व्हॉटसअप चॅटबॉट: चॅटबॉटद्वारे सहज माहिती मिळवण्याची सुविधा.

**तंत्रज्ञानाची जोड व भविष्यातील वाटचाल**

कॉल सेंटरमध्ये वापरले जाणारे अद्ययावत सॉफ्टवेअर, कॉल रेकॉर्डिंग व फीडबॅक सिस्टीम यामुळे सेवेचा दर्जा सुधारला आहे. आगामी काळात ही सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित प्राथमिक सल्ला व व्हॉट्सप चॅटबॉट यांसारख्या तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे नियोजन आहे. या प्रगत प्रणालीमुळे प्रत्येक कॉलचे अचूक ट्रॅकिंग व पशुवैद्यकांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे सुलभ होणार आहे. रुरल कनेक्टिव्हिटी व डेटा नालिटिक्सच्या जोडीने, दुर्गम भागातील पशुवैद्यकीय गरजांचे विश्लेषण करून आवश्यक कार्यवाही नियोजनपूर्वक करता येईल. प्रस्तावित एआय तंत्रज्ञानामुळे पशुपालकांना तातडीच्या परिस्थितीत प्रथमोपचार व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती काही सेकंदात उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे. डिजिटल क्रांतीची ही जोड पशुवैद्यकीय सेवांच्या कार्यक्षमतेत आमूलाग्र बदल घडवून आणणारी ठरेल, ज्यामुळे पशुधनाची हानी कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी मिळेल.

# काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी इच्छुकांनी अर्ज करावेत-राहुल सोनवणे

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्हातील सर्व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सुचने नुसार प्रदेश काँग्रेस कमिटीचे समन्वयक तथा निरिक्षक श्री.एम.एम.शेख (माजी आमदार),श्रीमती विद्याताई पाटील,श्री. सुरेंद्रजी घोडजकर व जिल्हाध्यक्ष श्री.राहुल सोनवणे यांच्या उपस्थिती मध्ये सर्व मुख्य जिल्हा / तालुका / शहर अध्यक्ष,युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष, एन एस यु आय जिल्हा अध्यक्ष,महिला काँग्रेस जिल्हा अध्यक्ष,सेवा दल जिल्हा अध्यक्ष,



अनुसूचित जाती विभाग जिल्हा अध्यक्ष एस सी, आदिवासी काँग्रेस एस टी जिल्हा अध्यक्ष,इतर मागासवर्गीय विभाग ओबीसी जिल्हा अध्यक्ष, अल्पसंख्याक विभाग जिल्हा अध्यक्ष,विमुक्त जाती व भटक्या जमती व्हीजेएनटी विभाग जिल्हा अध्यक्ष,सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष इत्यादी सेल या सर्व निवडी होणार आहेत

इच्छुकांनी विहित अर्ज नमुन्यातील अर्ज सविस्तर माहिती भरुन बायो-डाटा सह जिल्हा उपाध्यक्ष श्री.प्रविण कुमार शेप यांचे कडे प्रत्यक्ष अथवा पिडीएफ जमा करावी असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे.संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३४७२१०९, ८८०५२५५०५५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीसंत भगवानबाबा व संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि २१ एप्रील रोजी पांडुरंग महाराज यांचे काल्याचे किर्तन

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगररोड बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी वर्ष १४वे संत वामनभाऊ, संतभगवानबाबा, संत तुकाराम, विठ्ठल-रूक्मिणि, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दि १९/४/२०२६ते२१/४/२०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे या सप्ताहाचेद्वितीय दिनी. दि२१ एप्रील मंगळवार रोजी सकाळी ११वा ह भ प पांडुरंग महाराज (श्रीक्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवन) यांचे अमृत तुल्य काल्याचे किर्तन होईल तरी बीड शहरातील परीसरातील भाविक भक्तांनी किर्तन श्रावणाचा व महाप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी चे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी परिसरातील भाविक भक्त यांनी केले.



# पांगरी गोसावी येथे वन विभागाची धडक कारवाई; अवैध लाकूड वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त, गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

जिल्ह्यात अवैध वृक्षतोड व लाकूड तस्करीला आळा घालण्यासाठी वन विभागाने पुन्हा एकदा धडक कारवाई करत पांगरी गोसावी परिसरात दोन ट्रॅक्टरसह मोठा साठा जप्त केला आहे. मंगळवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी मौजे शंभू सावरगाव ते पांगरी गोसावी या मार्गावर ही कारवाई करण्यात आली.

पांगरी गोसावी हद्दीत गस्त घालत असताना दोन ट्रॅक्टरमध्ये कडुनिंब व बाभूळ प्रजातीचे अनगड (गोल) लाकूड अवैधरित्या वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. तत्काळ पथकाने कारवाई करत दोन्ही ट्रॅक्टर ताब्यात घेतले व लाकूड जप्त केले. ही कारवाई उपवनसंरक्षक सुवर्णा माने (छत्रपती संभाजीनगर) व सहाय्यक वनसंरक्षक सुदाम मुंढे (रोहयो व वन्यजीव, जालना) यांच्या आदेशान्वये करण्यात आली. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी विजय दौंड (जालना दक्षिण) व वनपरिक्षेत्र अधिकारी निता फुले (जालना उत्तर) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीपणे पार पडली.

सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ४१(१) व ५२ तसेच महाराष्ट्र वन नियमावली २०१४ च्या कलम ३१(१) अंतर्गत प्रथम गुन्हा क्रमांक ढ-०२/२०२६ नोंदविण्यात आला असून संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या कारवाईत वनपरीमंडळ अधिकारी एस. एन. पठाण (मंठा), वनरक्षक के. बी. वाकोदकर (मंठा) व के. जी. जाधव (घनसावंगी) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.दरम्यान, वन विभागाच्या या कडक भूमिकेमुळे अवैध वृक्षतोड व लाकूड तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा कारवाया यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा वन विभागाकडून देण्यात आला आहे.



# एरंडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण ला सुरुवात

दैनिक वादळ वार्ता
**औसा | प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील एरंडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात करण्यात आली एरंडी गावात ग्रंथ दिंडी व शोभायात्रेने विना पूजन व ज्ञानेश्वरी ग्रंथ पूजन करून सप्ताह ला सुरुवात करण्यात आली एरंडी येथे गेल्या सोळा वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो ,या सप्ताहाच्या माद्यमातुन गावात भक्तीमय वातावरण पहायला मीळते ,सात दिवस चालाणार्या सप्ताहात काकडा,हरीपाठ ,हरिजागर ,महिला भजन ,सह किर्तन सोहळा आयोजीत करण्यात आला असुन ,एरंडी येथील सप्ताहात ह .भ. प योगीराज महाराज सारोळकर ह .भ. प बजरंग महाराज गोपाळवाडी कर ह .भ. प व्यंकट



महाराज शेलुकर ,ह .भ प मोहन महाराज सिरसलकर ,ह भ प विलास महाराज महापूरकर,ह भ प उद्धव महाराज रमजानपूरक,
ह भ प दत्ता महाराज व्हटीकर सह काल्याचे किर्तन ह भ प बळवंत महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतुन होणार आहे तरी एरंडी सह परीसरातील भाविकांनी सप्ताहाचा आनंद घ्यावा असे एरंडी ग्रामस्थांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे ,,,

# राम कुलकर्णी यांची भारतीय जनता पक्षाच्या राज्य प्रवक्तेपदी फेरनिवड;कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केलेल्या नवीन कार्यकारिणीत राम कुलकर्णी यांची भाजपा राज्य प्रवक्तेपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. कुलकर्णी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.पक्ष संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने, घोषित करण्यात आलेल्या नव्या कार्यकारिणीत अनुभवी नेत्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे, ज्यामध्ये राम कुलकर्णी यांचा समावेश आहे. संघटनात्मक फेररचना आणि आगामी निवडणुकांसाठीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर कुलकर्णी यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्याला कारण ही तसेच आहे. राम कुलकर्णी हे यापूर्वीही भाजपाचे राज्य प्रवक्ते म्हणून जबाबदारी सांभाळत असून, शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्या विधानांना वेळोवेळी जशास तसे प्रत्युत्तर दिल्यामुळे कुलकर्णी हे चर्चेत आले होते. भाजपाने प्रदेश प्रवक्ता विस्तारित यादी जाहिर केली असून त्यात ज्येष्ठ पत्रकार राम कुलकर्णी यांची पुन्हा प्रदेश प्रवक्ता म्हणुन फेरनियुक्ती करण्यात आली. मागच्या ८ वर्षांपासून मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्रजी चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, महसूलमंत्री ना.बावनकुळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवक्तेपदी काम करताना संघटनात्मक कार्य आणि पक्षाची बाजू माध्यमांकडे प्रभावीपणे मांडण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले. बीड जिल्ह्यातील ते ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यात आनंद व्यक्त होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. २०१९ साली प्रदेश प्रवक्ता म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. मागील ८ वर्षे प्रसारमाध्यमांत त्यांनी केलेले लिखाण इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर मांडलेली बाजू एवढेच नव्हे तर विरोधकांवर तुटुन पडणारा, स्पष्ट वक्ता, परखड बोलणारा प्रवक्ता अशी त्यांची ओळख आहे. प्रदेश संघटनात्मक बदल झाल्यानंतर काही दिवसांपुर्वी प्रवक्ता पुनर्रचना प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यात विस्तारित प्रवक्ता यादी आज पुन्हा जाहिर करण्यात आली असून कुलकर्णी यांना प्रदेश प्रवक्ते म्हणुन पुन्हा घोषित करण्यात



आल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष आ.चव्हाण यांनी काढले. राम कुलकर्णी हे पत्रकारितेच्या माध्यमातून तब्बल ३३ वर्षांपासून बीड जिल्ह्याच्या समाजकारण आणि राजकारणात काम करतात. त्यांनी दिवंगत नेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे सोबत ३० वर्षे काम केले. पक्षाचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसारमाध्यमांतून परखड विचार मांडले, स्पष्टवक्तेपणा ठेवला आणि ठाम भूमिका घेतली. स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे पट्टशिष्य म्हणून विशेष ओळख आहे. राजकिय विश्लेषक म्हणून त्यांचे लिखाण नेहमीच चर्चेत असते. विविध क्षेत्रात त्यांची भरीव कामगिरी आहे. पत्रकारिता, शिक्षण, राजकारण, समाजसेवा आणि अध्यात्मिक क्षेत्रात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. एक वास्तववादी लिखाण करणारा पत्रकार ही पण त्यांची ओळख आहे. सध्या ते उज्जैन (इंदौर) येथे भाजपाच्या राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी आहेत. तिथे त्यांना त्यांच्या फेरनिवडीची माहिती प्राप्त झाली. प्रवक्तेपदी नांव घोषित होताच भाजपाचे राष्ट्रीय, राज्य, विभागीय आणि जिल्हा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रमुख नेते, मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ते भारतीय जनता पक्ष अशी राजकीय वाटचाल करताना, विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी घेतलेला विधायक पुढाकार या दरम्यान पुन्हा एकदा प्रवक्तेपदी पक्ष नेतृत्वाने मला संधी देवून माझ्यावर जो विश्वास टाकला. तो आपल्या कामातून सेवाभाव वृत्तीने पुढे जाताना सार्थ करून दाखवू असे राम कुलकर्णी यांनी सांगितले आहे.ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते असूनबीड जिल्ह्यात पक्षाचे काम करीत असताना राम कुलकर्णी हे ना.पंकजाताई यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. मागील अनेक वर्षांपासून ते मुंडे कुटुंबियांचे निष्ठावंत सहकारी आहेत.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे, महसूलमंत्री ना.बावनकुळे साहेब, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आमदार सौ.नमिताताई मुंदडा, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यासह बीड जिल्ह्यातील भाजपाचे सर्व सन्माननीय आमदार, माजी आमदार, माजी खासदार, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी माझ्या पक्ष कार्यावर जो विश्वास दाखवून माझी फेरनिवड केली. त्याबद्दल पक्ष नेतृत्वाचे जाहीर आभार व्यक्त करून माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरविणार आहे असे नवनियुक्त भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077